


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ९२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पुण्यात रिंग रोडच्या कामाला गती! ११७ गावांचे सर्वेक्षण पूर्ण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, पुणे :** पुण्याच्या प्रस्तावित वर्तुळाकार मार्गाच्या (रिंग रोड) भोवतालच्या ११७ गावांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी या गावांचे सर्वेक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, येत्या दोन वर्षांत या गावांचा विकास आराखडा (डीपी) राज्य सरकारला सादर करण्यात येणार आहे.

या गावांमध्ये शिक्षणसंस्था, गृहप्रकल्प (टाउनशिप) यांसह ट्रक टर्मिनल, लॉजिस्टिक पार्क, ट्रॉमा केअर यांसारख्या विविध घटकांशी संबंधित सुविधांची निर्मिती केली जाणार आहे. पुण्याच्या रिंग रोडचे काम सुरू झाल्यानंतर 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'च्या हद्दीतील हवेली, मुळशी, भोर, वेल्हे आणि पुरंदर या पाच तालुक्यांतील ११७ गावांच्या नियोजनाची जबाबदारी 'राज्य रस्ते विकास महामंडळा'कडे (एमएसआरडीसी) दिली होती. या सर्व गावांचे क्षेत्र सुमारे ६६८ चौरस किमी आहे. या सर्व गावांसाठी विकास आराखडा तयार करण्याचा आदेश सरकारने 'एमएसआरडीसी'ला दिल्यानंतर सर्व गावांतील सर्वेक्षण नुकतेच पूर्ण झाले. या सर्वेक्षणानंतर झालेल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या बैठकीत या गावांच्या विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**गावांचा ड्रोन सर्व्हे पूर्ण**

या गावांचे सर्वेक्षण करताना सध्या कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, कोणत्या प्रकारची बांधकामे झाली



आहेत, याचा आढावा घेतानाच, अस्तित्वातील जमीन वापराची (ईएलयू) माहिती संकलित करण्यात आली आहे. खेळाची मैदाने कोठे आरक्षित केली आहेत; शिवाय अन्य खुल्या जागांवर कोणत्या सुविधा करण्याचे नियोजन आहे, याकरिता ड्रोनद्वारे सर्वेक्षण केले गेले. उपलब्ध मोकळ्या जागांचे नियोजन आणि विकास करणे शक्य आहे. त्यानुसार नव्याने नियोजन केले जाणार आहे.

भविष्यात या गावांचा विकास करताना त्या गावातील लोकसंख्याही वाढेल. त्यामुळे त्या गावांसाठीची पाणीपुरवठ्याची सुविधा, पाण्याच्या टाक्या, क्रीडांगणे, स्मशानभूमी, मलनिस्सारण प्रकल्प, पर्यटन, अग्निशामक दलासारख्या सुविधांसाठी जागा आरक्षित करावी लागेल. त्या भागाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. नद्यांचे प्रदूषण होऊ नये, यासाठी नद्यांजवळ सांडपाणी प्रकल्प उभारून अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन आहे. यासाठी दोन ग्रोथ सेंटर विकसित केली जाणार आहेत.

**एज्युकेशन, इंडस्ट्रियल हब**

या गावांत उद्योग कंपन्या असल्यास तेथे 'इंडस्ट्रियल हब' विकसित केले जाईल. ११७ पैकी बहुतांश गावे ही महामार्गालगत असल्याने त्या ठिकाणी विद्यापीठ, शिक्षण संस्थांना आवश्यक जागा आरक्षित केली जाईल. उद्योगांसाठी 'लॉजिस्टिक पार्क' उभारण्यात येणार आहे.

वाढती लोकसंख्या आणि वाढत्या वाहनांमुळे आतापासूनच १८, २४ आणि ३० मीटर रुंदीच्या आकारांचे मोठे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील २० वर्षांतील भविष्यातील घडामोडीचा विचार करूनचा डीपी तयार करण्यात येणार आहे, याकडे अधिकाऱ्यांनी लक्ष वेधले आहे.

## मालमत्ता करावर ७५ टक्के सूट !




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, पनवेल :** महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार १५ नोव्हेंबर पर्यंत शास्तीवरती ७५ टक्के सुट देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या अभय योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आला आहे. अभय योजनेंतर्गत आत्तापर्यंत सवलतीसह ५९४.१० कोटींचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

याआधी महापालिकेने करदात्यांना शास्तीमध्ये तब्बल ९० टक्के सवलत होती. त्यानंतर आता १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ७५ टक्के शास्ती माफी देण्यात आली आहे. आता या सवलतीचे केवळ दोन दिवस राहिले आहेत. नागरिकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २% सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, शेड नेट, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २% सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रोस्त पद्धतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार २ टक्के करात सवलती मिळणार आहे.

कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे.

## लासलगावमध्ये प्रतिबंधित गुटखा, जर्दा साठा जप्त




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** लासलगाव पोलिसांनी साईनगर परिसरात छापा टाकत प्रतिबंधित गुटखा, जर्दा व सुगंधित तंबाखूचा मोठा साठा जप्त केला असून एका तरुणास अटक करण्यात आली आहे.

दि.१३ नोव्हें रोजी दुपारी २.४० च्या दरम्यान लासलगाव पोलिस पथकाने शैलेश नंदकुमार बागमार, वय २१, रा.साईनगर, लासलगाव याच्या गाळ्यामध्ये छापा टाकला. यावेळी पोलिसांना महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखू आणि जर्दा गुटखा मोठ्या प्रमाणावर साठवलेला स्थितीत आढळून आला. त्यात एकूण ९७२० रु.किमतीचा प्रत्येकी ३६० रु.किंमत असलेल्या सुगंधित पान मसाल्याच्या २७ पेट्या, गोवा पान मसाला १८ हजार रु किमतीच्या ५ गोण्या, १८३६० रु किंमतीचे शॉट नाव असलेले तंबाखुचे १०२ पुडे, ३६६० रु.किंमतीचा जी वन जर्दा नाव असलेले १२२ पुडे, २८५ रु.किंमतीचा झेड.एन.वन जाफरानी जर्दा नाव असलेले ५७ पाकिटे असा एकूण ५२,५९० मुद्देमाल आढळून आला. राज्यात सुगंधित तंबाखू, जर्दा आणि गुटखा यांच्या उत्पादन, साठवण आणि विक्रीवर बंदी असूनही आरोपी शैलेश बागमार यांनी आर्थिक फायद्यासाठी हा साठा ठेवला होता. त्यामुळे पो. कॉ. संदिप डगळे यांच्या फिर्यादीवरून बागमार यांचे विरोधात गु.र. २६१/२०२५ भा.न्या.संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक किरण साळुंके अधिक तपास करीत आहेत.

## कवडीमोल भावाअभावी कांद्याच्या शेतात सोडल्या शेळ्या-मेंढ्या

# कांदा शेतकऱ्याला ढसाढसा रडवतोय

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे लाल कांदा पीक वाया गेले असून, तीन महिन्यांपूर्वी हजारो रुपये खर्च करुन लाल कांदा पिकाची लागवड केली होती. या पिकातून चार दोन पैसे मिळतील आणि त्यातून कुटुंबाचा गाडा हाकण्यास मदत होईल ही अपेक्षा होती.

पण सध्या कांद्याला जो भाव मिळतोय त्याने कांद्याचा साधा खर्च देखील वसूल होत नाही. त्यामुळेच टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर) येथील आदित्य रांधवण या सुशिक्षित तरुण शेतकऱ्याने दोन एकर लाल कांदा पिकात शेळ्या मेंढ्या चरायला सोडल्या. मागील वर्षी लाल कांदा पिकाला चांगला भाव मिळाला म्हणून यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लाल कांदा पिकाची लागवड केली. मात्र, भावात ५०० ते ६०० रुपयांच्या पुढे वाढ होत नसल्याने व हा भाव परवडणारा नसल्याने शेतकरी चिंतातूर आहे. रोज जूना गावरान व नवा लाल कांदा बाजारात येऊ लागल्यामुळे



## लागवडीचा खर्चही निघेना !

पुढे कांद्याला बाजार भाव मिळेल की नाही, उत्पादन खर्चही सुटणार नाही त्यामुळे अजुन कशात अजून कशाला तोट्यात जायचं अन् उद्या भाव वाढले तर..असे प्रश्न शेतकऱ्यांची द्विधावस्था करत आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पिकवलेल्या कांदा पिकाला बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

त्यामुळे पीक शेतात तसेच सोडून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. टाकळी ढोकेश्वर येथिल आदित्य रांधवण या शेतकऱ्यांने आपल्या दोन एकर उभ्या कांद्याच्या पिकात शेळया मेंढ्या चरावयाला सोडून पीक नष्ट केले. टाकळी ढोकेश्वर परिसरातील बहुतेक शेतकरी कांदा पिकाला बाजारभाव नसल्यामुळे काढणी करण्याचे काम थांबवले आहे. पीक काढणीला आले मात्र बाजारभाव नसल्यामुळे शेतकऱ्यांचे कष्ट मातीत गेले आहे.

> “ दोन एकर शेतात लाल कांदा पीक होते. मागिल महिनाभरापासून बाजारभावात सुधारणा झाली नाही. शेतीची मशागत, कांदा रोपे लागवड, खुरपणी, औषध फवारणी यामध्ये ९० हजार रुपये पाण्यात गेले आहे. तसेच पिकांची काढणी, भरणी, वाहतूक त्यातच बाजार भाव नसल्यामुळे हा खर्च पुन्हा तोट्याचा ठरणार आहे. मागिल वर्षी ३० ते ३५ रुपये किलो बाजारभाव मिळाला होता. सध्या किलोला ५ ते ६ रुपये बाजारभाव मिळत आहे. त्यामुळे आज दोन एकर क्षेत्रावर शेळ्या मेंढ्या सोडण्याची वेळ आली आहे.
>
> **- आदित्य रांधवण,**
> **शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**

## पुण्यात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिक त्रस्त

**दि.१४, पुणे :** पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी आज नऱ्हे परिसरात वाढत चाललेल्या अपघातांच्या मालिकेमुळे सातारा – मुंबई राष्ट्रीय मार्ग रोखून आंदोलन केले आहे. यावेळी प्रशासनाची तिरडी बांधून रस्त्यावर मांडून निषेध नोंदवला आहे. अंत्ययात्रा आणि अंत्यविधीचे प्रतीकात्मक आयोजन करून नागरिकांनी शासनाला जाग होण्याची साद घातली आहे.

अलीकडच्या अपघातात लहान मुलीसह कुटुंबाची झालेली होरपळ पाहून . या भागात मृत्यूंची मालिका सुरू आहे. प्रशासन काहीच करत नाही. असेच चालू राहिले तर लोकांना जगण्यापेक्षा आत्महत्या करावीशी वाटेल, अशी वेदनादायी भावना भूपेंद्र मोरे यांनी व्यक्त केली आहे. जय हरी वडगाव आणि आसपासचे नागरिकही भीतीच्या सावटाखाली आहेत. या आंदोलनात भुपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान जवळपास दोन तास



सातारा–मुंबई महामार्गावरील वाहतूक ठप्प करण्यात आली होती. मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना कराव्यात, रस्त्यांची पाहणी करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी मोरे म्हणाले, शासनाचे अधिकारी पाहणी करून जातात, आश्वासने देतात, पण बदल काहीच होत नाही. आमचे जीव गेले तरी प्रशासन जागे होत नाही. तुम्ही केलेल्या मदतीने ते जीव पुन्हा येणार नाहीत. त्यामुळे भविष्यात अशा घटना घडून नयेत यासाठी आपण उपाययोजना करणे गरजेचे आहे

दरम्यान, नऱ्हे परिसरातल्या नवले पुलावर काल रात्रीच्या सुमारासही भीषण अपघात झाला आहे. दोन कंटेनरमध्ये एक कार चेपली होती, यावेळी मोठा आवाज झाला, आग लागली व अनेक वाहने यात जळाली. यामध्ये आठ जणांचा मृत्यू व २५ जण जखमी झाले आहेत.

या आंदोलनात श्री राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी , हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, महेश गाडगे, सुशील भागवत, आनंद थेऊरकर, सुदर्शन देशमाने, सोनाली नायर यांसह अनेक नागरिक उपस्थित होते. नऱ्हे परिसरातील लोकांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर पुढील काळात आणखी मोठे आंदोलन उभे राहील, असा इशाराही भूपेंद्र मोरे यांनी यावेळी दिला आहे.

## पंडित जवाहरलाल नेहरू यांना जयंतीनिमित्त राजभवन येथे अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, मुंबई :** देशाचे पहिले पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी राजभवन येथे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी पंडित नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ निशिकांत देशपांडे, राज्यपालांचे परिसहायक ले. विक्रम कुमार तसेच राजभवनातील अधिकारी कर्मचारी आणि राजभवन येथे कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी अमलदारांनी देखील दिवंगत पंडित नेहरू यांना अभिवादन केले.




## मंजुरी झाली, कार्यवाही कधी?

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांच्या यादीत धाराशिव जिल्ह्यात सर्वात शेवटी ब्रॉडगेज झाले. धाराशिवकरांना मुंबई खऱ्या अर्थाने जवळ झाली. धाराशिवला श्री क्षेत्र तुळजापूरमार्गे सोलापूर रेल्वे जोडणीचा प्रकल्प अनेक वर्षे विचाराधीन होता. आर्थिक तरतूद, व्यवहार्यता आणि गरज या बाबी तपासून निर्णय घेतला गेला.

धाराशिव–तुळजापूर–सोलापूर या ८६ किमीच्या रेल्वेमार्गासाठी मंजुरी दिली गेली. केंद्र व राज्य सरकारने ५० टक्क्यांचा हिस्सा द्यावा, असे ठरले. राजकीय सुंदोपसुंदीत प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्याकडे लक्ष गेले नाही. केंद्र सरकारने त्यांचा हिस्सा देण्यासाठी घोषणा केली होती. सर्वेक्षणात मार्गाची लांबी चार किलोमीटरने वाढून ९० किलोमीटर झाली. सुरुवातीला ९०४ कोटी ९२ लाखांच्या प्रकल्पास मंजुरी दिली गेली. धाराशिव – तुळजापूर दरम्यान काम सुरू झाले आहे. तुळजापूर – सोलापूर दरम्यान काही ठिकाणी जमीन संपादित करणे, कायदेशीर बाबींची पूर्तता गेल्या काही महिन्यांत करण्यात आली. दरम्यान, सुरुवातीला मंजूर झालेला प्रकल्पाचा आकडा तिपटीने वाढला. त्यासाठी सुधारित प्रस्ताव राज्य सरकारने सादर करून केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे वाढीव प्रकल्प किमतीनुसार रेल्वे बोर्डाने तरतूद करावी, अशी मागणी केली. त्यानुसार रेल्वे बोर्डाने ५० टक्के तरतूद केली. राज्याच्या हिश्शाचा उर्वरित ५० टक्के वाटा देण्यात राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली. त्यानुसार तीन हजार २९५ कोटी रुपयांचा सुधारित आराखडा मंजूर झाला. या रेल्वेमार्गाचा विषय धाराशिव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सातत्याने विधिमंडळात लावून धरला होता. आता यास मंजुरी मिळाल्याने श्री क्षेत्र तुळजापूर राष्ट्रीय नकाशावर झळकण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

या प्रस्तावातील तरतुदींनुसार धाराशिव रेल्वे स्थानक पूर्वी प्रस्तावित होते, त्याच्या तिप्पट मोठे होणार आहे. पर्यायी रेल्वे मार्ग उभारले जातील, प्रवाशांसह कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी अद्ययावत सोयी सुविधा निर्माण तर होतीलच, पण पुलांची संख्याही वाढवली जाईल, जेणेकरून दळणवळणाची अडचण बऱ्यापैकी दूर होईल. सोलापूर शहरात रेल्वेमार्गासाठी जमीन संपादित करावी लागणार आहे. त्यासाठी प्रचलित दर गृहित धरण्यात येतील; ज्यामुळे जमीन संपादनाचा तिढा सुटण्यास मदत होईल. धाराशिवमधील मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत पूर्वी प्रस्तावित चार हजार चौरस मीटरऐवजी १२ हजार ६३० चौरस मीटर प्रस्तावित करण्यात आली. या मार्गावरून जाणाऱ्या जलदगती गाड्यांना स्वतंत्र मार्गाची पर्यायी व्यवस्था, यार्डाच्या आवश्यकतेनुसार लूपलाइन टाकली जाईल. मागच्या प्रस्ताव रस्त्याखालून जाणाऱ्या पुलांची संख्या २० होती आता ती ३१ होईल. सोलापूर – धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पुलाची लांबीही वाढविण्यात येणार आहे. प्रवाशांसाठी सुविधा, रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची संख्या ३४२ वरून ३७३ प्रस्तावित करण्यात आली आहे. मंजूर झालेला प्रस्ताव चांगला वाटत असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, याबाबत अजूनही अनिश्चितता आहे.

पूर्वीच्या प्रस्तावानुसार राज्य सरकारने मूळ प्रकल्प किमतीनुसार ४५० कोटींचा हिस्सा दिला आहे. आता वाढीव दोन हजार कोटींपैकी एक हजार कोटी देण्यासही मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली. केवळ मंजुरी देऊन काम सुरू होणार नाही, त्यासाठी निधीची तातडीने उपलब्धतता करून देणे आवश्यक आहे. कागदावर मंजूर केलेले हजारो प्रकल्प निधीअभावी रखडल्याची उदाहरणे आहेत. त्यात आणखी एका प्रकल्पाची भर पडू नये. तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसे झाले तर देशात तुळजापूर देशाशी रेल्वेने जोडले जाईल. सोलापूर – हैदराबाद रेल्वेजोडणीला नवा पर्याय उपलब्ध होईल. मुंबईहून दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांची संख्याही वाढून प्रवाशांना अधिकाधिक चांगल्या सुविधा मिळण्यास मदत होईल. धाराशिव जिल्हा रेल्वेमार्गे पश्चिम महाराष्ट्राला अधिक चांगल्या पद्धतीने जोडला जाईल. प्रस्तावित रेल्वेमार्गाजवळ तुळजापूर तालुक्यात औद्योगिक वसाहत विकसित होणार आहे. भविष्यात या वसाहतीला रेल्वेमार्गाचा फायदा होईल. राज्य सरकारने या बाबींचा विचार करून धाराशिव–तुळजापूर – सोलापूर रेल्वेमार्ग लवकर कसा पूर्ण होईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# दिल्लीतला भयानक स्फोट: वेदना, शंका आणि जबाबदारी

राजधानी दिल्लीच्या निःशब्द सकाळी अचानक झालेल्या एका कार स्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून टाकले. धुराने भरलेल्या रस्त्यावर, किंचाळ्यांनी थरथरलेल्या आकाशाखाली, क्षणात घडलेली ती घटना फक्त शहराला नव्हे तर भारतीय जनमानसालाही हलवून गेली. ही घटना केवळ एका वाहनाच्या स्फोटाची नाही तर ती देशाच्या सुरक्षेवरील, राजनैतिक शिस्तीवरील आणि आपल्या सामूहिक असुरक्षिततेवरील कठोर प्रश्नचिन्ह आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक रस्त्यावर, रेड फोर्टच्या जवळ एका कारमधून अचानक झालेल्या स्फोटाने अनेक जीवनं संपवली आणि हजारो लोकांच्या मनात भीतीची आणि असमंजसतेची झळ उभी केली आहे. हे केवळ एका क्षणातील भीषण घटना नाही तर ह्या देशाच्या सुरक्षिततेवरील आणि नागरिकांच्या दैनिक जिवनावरच्या हमखास परिणामांचाही प्रश्न आहे. सरकारने ही घटना आताही दहशतवादी घटना म्हणून मान्य केली असून तपासाच्या व्यापक यंत्रणेला आदेश देण्यात आले आहेत. या घटनेत मृतांची संख्या आणि जखमींचे वेदनादायी दृश्ये आपल्याला आठवण करून देतात की आतंकवाद म्हणजे फक्त संरचना भडकेस दाखवणारी क्रिया नव्हे, तर ते आपल्या समाजातील सर्वात सामान्य माणसांचे भविष्य, कुटुंब आणि स्वप्नांचे विघटन आहे. पहिल्या तासांतच लोकांनी आपापल्या नातेवाईकांची माहिती शोधली, हॉस्पिटल्सवर भावनिक रांगा केल्या आणि वार्तांनी शहरात घाबरलेले वातावरण पसरले. म्हणजेच, मानवी त्रास हा घटनापेक्षा कितीतरी पटीने मोठा असतो.



पोलिसांनी घटनास्थळावरून अनेक नमुने गोळा केले आहेत. वाहनाचे अवशेष, धातूचे तुकडे आणि फॉरेन्सिक तपासणीसाठी सुमारे चाळीसहून अधिक नमुने केंद्राकडे पाठवले गेले असून, प्राथमिक तपासात स्फोट अत्याधुनिक विस्फोटकाने झाल्याची शक्यता व्यक्त झाली आहे. एनआयए आणि दिल्ली पोलिसांचे पथक रात्रीपर्यंत शोधमोहीम राबवत आहे. तसेच, संशयित वाहन आणि त्याच्या मालकाच्या मागोमाग शेजारील राज्यांमध्ये आणि गावांमध्ये छापा मारण्यात आले आहेत; काही लोकांना ताब्यातही घेतल्याचे वृत्त आहे. ह्या प्राथमिक तपासांनी सूचित केले आहे की, या स्फोटाचा संदर्भ केवळ स्थानिक गुन्हेगारी नव्हे तर संघटनाबद्ध दहशतवादाशी संबंधित असण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे देशाच्या सुरक्षा यंत्रणांनी विशेष कायदे आणि राष्ट्रीय तपास संस्था या प्रकरणात सक्रिय केल्या. आता तपासाच्या दिशा दोन आहेत. पहिली, स्थानिक गुन्हेगारी टोळीचा हात आणि दुसरी, परदेशी दहशतवादी संघटनांशी संभाव्य संबंध.

मीडिया अहवालांनुसार प्राथमिक चौकशीत काही संशयित व्यक्ती आणि कनेक्शन पाकिस्तान–आधारित गटांशी जोडले जात आहेत. विशेषतः जैश–इ–मोहम्मद सारख्या संघटनांचा संदर्भ येत आहे, परंतु हे निष्कर्ष अद्याप अंतिम सिद्ध झालेले नाहीत. ही बाब अजून तपासाधीन आह आणि घाईघाईने निष्कर्ष काढणे म्हणजे न्यायाच्या प्रक्रियेला धक्का देणे होईल. तपासकांद्वारे पकडलेलेल्या व्यक्तींचे संबंध, संदेशवाहक, आणि आंतरराज्यीय हालचाली तपासल्या जात आहेत; परदेशी हाताचे



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

आरोप करणे ही गंभीर बाब आहे आणि त्यासाठी ठोस दर्शने आवश्यक आहेत. माध्यमांच्या आळ्यानुसार आत्तापर्यंत काही ज्या तपास–उपक्रमांबाबत माहिती समोर आली आहे, त्यात पाकिस्तान–आधारित संघटनांचा संदर्भ आला आहे. परंतु हा तपास अजून प्रवाही व विस्तृत स्वरूपात आहे. भारताने नेहमीच आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. पण आता या घटनेने पुन्हा एकदा दाखवले की, शब्दांपेक्षा कृतीचा काळ आला आहे. राजनैतिक दबाव, सीमा सुरक्षा, गुप्तचर यंत्रणांची अद्यावत क्षमता आणि सायबर–आधारित मॉनिटरिंग प्रणाली, हीच या नव्या काळाची शस्त्रं आहेत.

दिल्लीने आतापूर्वीही अशा प्रकारच्या भयकृत घटनांना सामोरे गेले आहे. ही पहिली वेळ नाही तर यापूर्वी २००५, २००८, २०११ आणि २०२१ मध्येही राजधानीत अशाच प्रकारचे स्फोट झाले. त्या आत्मघाती आणि स्फोटांची स्मृती ताजी आहे. अशा पार्श्वभूमीवर, जर तपासात पाकिस्तान–स्थित संघटनांचा ठोस पुरावा मिळाला, तर त्याचे राजनैतिक व सामरिक परिणामही दूरगामी असतील. परदेश धोरण, सीमा सुरक्षा आणि परस्पर विश्वास या सर्वांवर प्रभाव पडू शकतो. परंतु हे राजकीय परिणाम योग्य तपास व पुराव्यांवर अवलंबून असावेत; ज्या क्षणी तपास पूर्णपणे सिद्ध करणार त्या पुराव्यांचा आधार न घेताच घोषणा केल्या गेल्या तर चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता वाढते. प्रत्येक वेळी सरकारने सुरक्षा वाढवण्याची, तपास जलदगतीने करण्याची घोषणा केली. परंतु काही महिन्यांनी तीच शिथिलता, तीच निष्क्रियता दिसून आली. आज पुन्हा तोच प्रश्न समोर आहे, आपली सुरक्षा फक्त फाईल्सपुरती आहे का?

त्याकरिता आपल्या सरकारकडून आणि समाजाकडून काही अपेक्षा आहेत. जसे कडक पण पारदर्शक तपास, सर्व पुरावे ताब्यात घेऊन, फॉरेन्सिक आणि सायबर तपास त्वरित आणि वैज्ञानिक पद्धतीने करणे आवश्यक आहे. एखाद्या देशावर आरोप करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्तरावरही पुरावे सादर करण्याजोगे असावेत. दुसरे असे की, स्थानीय सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, सार्वजनिक स्थळांवर तातडीने सुरक्षा बळ वाढवले पाहिजे; वाहन तपास, सीसीटीव्हीचे विश्लेषण आणि बायोमेट्रिक/फॉरेन्सिक क्षमता वाढवणे गरजेचे आहे. तिसरे, समावेशक सामाजिक प्रतिसाद, भय पसरवणाऱ्या प्रतिक्रीयांपासून बचाव करायला हवेत; चुकीच्या अफवांमुळे समाजात गुप्तमत निर्माण होऊ नये. पीडित कौटुंबिकांना तातडीची आर्थिक व मानसिक मदत देणे अत्यावश्यक आहे. तसेच, डिप्लोमॅटिक पिढी, जर परदेशी हात सिद्ध झाला तर तेथील कूटनीतिक चॅनेल्स आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयीन प्रणालीचा वापर करून मुद्दा मांडला जावा. युद्धगाठ किंवा आक्रोशापेक्षा कायदेशीर व राजनैतिक मार्ग अधिक स्थायी असतात.

स्फोटाने उडवलेली शोकरात्र आणि जखमी लोकांची औषधासाठीची नजर. हे सगळे दर्शन आपल्याला विसरू नयेत. दुःखाचे क्षण सामाजिक सहकार्याने कमी होतातः रक्तदान, आर्थिक मदत आणि भावनिक आधार यांमुळेच पीडित कुटुंबांना उभारी येते. जर तपासात खऱ्या अर्थाने परदेशी गुन्हेगारांचे हात सापडलेही तरही आपली सुरक्षात्मक प्रतिक्रिया आणि न्याय मागणी मानवीय आणि कायदेशीर मार्गांनी केली पाहिजे. या स्फोटात गमावलेले जीव, जखमी झालेल्या निरपराध नागरिकांची वेदना आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिसणारे अविश्वासाचे सावट. हे सगळं एकत्र पाहिलं की प्रश्न पडतो, कधी थांबेल हा हिंसेचा खेळ? दहशतवादाला धर्म, देश किंवा विचारसरणी नसते. तो फक्त भीती निर्माण करतो, आणि ती भीती आपल्याला एकमेकांपासून दूर नेते. आज गरज आहे ती एकतेची, समजुतीची आणि सहानुभूतीची. स्फोटानंतर सर्वसामान्य नागरिकात निर्माण झालेली भीती स्वाभाविक आहे, परंतु अफवांवर विश्वास ठेवू नये, कारण दहशतवाद केवळ बॉम्बने नाही तर अफवांनीही मन उडवतो. आपण सजग राहून, संशयास्पद हालचालींची माहिती दिली, तर देशाचं सुरक्षा कवच अधिक मजबूत होईल. दिल्लीतील कार स्फोटात झालेली हानी आणि सामाजिक धक्का अतिशय मोठा आहे. दिल्लीतील हा कार स्फोट फक्त राजधानीचा नाही, तर संपूर्ण भारताचा धक्का आहे. प्राथमिक तपासानुसार काही मीडिया अहवाल पाकिस्तान–आधारित संघटनांशी जोडलेले संदर्भ देतात, परंतु हे अंतिम निष्कर्ष नाहीत. तपास सुरू आहे आणि देशाने संयम राखून, पुराव्यांच्या आधारावर न्याय्य निर्णय घ्यावा. पीडितांना त्वरित मदत देणे, सुरक्षा मजबूत करणे आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर मार्ग वापरून दोषींवर कारवाई करणे, हे आपल्या देशाची जबाबदारी आहे. ही घटना आपल्याला सांगते की, सुरक्षा ही फक्त सरकारची जबाबदारी नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची शपथ आहे. शेवटी, भयाच्या अंधारात मानवी सहानुभूतीच आपल्याला प्रकाशाकडे घेऊन जाईल. आपण भितीने नव्हे तर विश्वासाने पुढे गेलं पाहिजे, कारण प्रत्येक स्फोटानंतर राखेतून उभा राहणारा भारत हा जिद्दी, संयमी आणि न झुकणारा भारत आहे. या कार स्फोटावर पर्याय म्हणून सावध देश, सजग जनता आणि सशक्त सुरक्षा हवीच.

## बातमी..

गृप वरती गरारा फिरे
मृत्यूची खोटी बातमी
वाहत्या प्रसिद्ध झोता
धुऊन घेतोय हात मी

लाईक करे मुर्ख कैक
उद्यमी तयार रिकामी
व्हायरल करी सरारा
बुध्दीभ्रष्ट ती निकामी

जवळीक साधे हळुचं
संधी कुणामिळे नामी
कुटूंबीयाच्याासंपर्कास
दौलतअदा ही इनामी

ट्विटरवर पडे पाऊस
भलेकुणा हो बदनामी
हतबध्द जिव्हाळ्याचे
अचानक येता सुनामी

नुकसान भरुन येण्या
कोण कधी देतो हमी
भांडवलं हे भावनांचे
वळवळती किडे कृमि

क्षमासुध्दा मागतनाही
कसे निष्ठुर असेहरामी
तोफेच्या तोंडी दे असे
धडा धडा द्या सलामी


नव तंत्रज्ञानाची अशी
कितीकरणारं गुलामी
जीवंत माणसा धडाड
द्या श्रध्दांजलीसलामी

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक व वेधक बातमी

# जननायक बिरसा मुंडा

आज १५ नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या



जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला.

**आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सोयगाव शेंदूरणी रस्ता तात्काळ सुरू करा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा - भाजपा जिल्हा चिटणीस गावंडे



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१४, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** अनेक वर्षांपासून सोयगाव - शेंदुर्णी हा महत्वाचा मार्ग अक्षरशः खड्ड्यांमध्ये हरवला आहे. मराठवाडा आणि खानदेशाला जोडणाऱ्या या प्रमुख रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, रस्ता ओळखूही न येण्याजोगा झाला आहे. या रस्त्यावर दररोज दुर्घटना घडत असून, आतापर्यंत अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा जिल्हा चिटणीस सुनील गावंडे यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले की, सोयगाव - शेंदुर्णी रस्त्याचे काम तातडीने सुरू न केल्यास भाजपकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. गावंडे यांनी पुढे सांगितले की, हाच रस्ता मराठवाडा आणि खानदेश या दोन प्रदेशांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या जोडणारा कणा आहे. त्यामुळे हा रस्ता सुरू करणे केवळ विकासाचा प्रश्न नाही, तर जनतेच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यांनी सोबतच सोयगाव - पलासखेडा रस्ता व सोयगाव - शेंदूरणी मार्गाचे कामही एकाचवेळी सुरू करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. याप्रसंगी तालुका अध्यक्ष संजय पाटील, माजी सरपंच वसंत बनकर, राजेंद्र जावळे, अध्यक्ष बद्रि राठोड, तालुका खरेदी विक्री संघ संचालक मंगेश सोहनी, मयुर मनगटे, प्रमोद पाटील, ता.उपाध्यक्ष विशाल गिरी, राजेंद्र म्हस्के, आदी मान्यवर उपस्थित होते. जनतेकडून देखील या मागणीला जोरदार पाठिंबा मिळत असून, रस्ता कामाचा विषय आता आंदोलनाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे.

## भारती विद्यापीठ बालविकास मंदिर, सोलापूर येथे साजरा बालदिन



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१४, सोलापूर :** भारती विद्यापीठ बालविकास मंदिर, सोलापूर येथे बालदिन उत्साहपूर्ण वातावरणात आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. लहानग्यांच्या निरागसतेचा आणि त्यांच्या कल्पनाशक्तीचा उत्सव म्हणून ओळखला जाणारा बालदिन यंदाही विद्यालयात संस्मरणीय ठरला. दिवसाची सुरुवात स्वच्छ, मनमोहक सजावट आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक कार्ड्स, चित्रकला आणि हस्तकला प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाची सुरुवात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. बालविकास मंदिराच्या मुख्याध्यापिका वैशाली मोहोळे तसेच शिक्षकशिक्षिकांनी या प्रसंगी मुलांना बालदिनाचे महत्त्व समजावून सांगितले. मुलांमध्ये दडलेली कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि उत्साहच समृद्ध भारताचे पायाभूत बळ आहे, असे प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. छोट्या मुलांनी सादर केलेले नृत्याविष्कार, देशभक्तीपर गीत, अभिनय व लहान मुलांचे फॅशन-शो विशेष आकर्षण ठरले. प्री-प्रायमरीतील विद्यार्थ्यांनी 'माझं स्वप्न' या विषयावर रंगतदार भाषणं केली. त्यांच्या समोरासमोर कौतुकानं टाळ्या वाजवत शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिलं.या कार्यक्रमातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'आनंद मेळावा'. या मेळाव्यात विविध खेळ, चित्रकला स्पर्धा, कथा सांगणे, पपेट शो यांचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी त्यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. शाळेचा आवार सतत मुलांच्या हास्याने आणि आनंदाने गजबजलेला दिसत होता. तसेच, 'स्वच्छता आणि आरोग्य' या विषयावर मुलांसाठी प्रात्यक्षिक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. हात धुण्याची योग्य पद्धत, पौष्टिक आहाराचे महत्त्व आणि दैनंदिन शारीरिक क्रियांची आवश्यकता यावर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला पालकांनीही भरभरून प्रतिसाद दिला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट्स, बालदिन स्मरणिका व बक्षिसांचे वाटप करण्यात आले. विजेत्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावरचे आनंदी भाव आणि शिक्षकांच्या डोळ्यातील समाधान पाहून संपूर्ण विद्यालयामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. बालदिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकशिक्षिकांसह सर्व सहायक कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर पालकांशी संवाद साधत शाळेच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशाप्रकारचे उपक्रम सातत्याने राबवण्याचे आश्वासन दिले. भारती विद्यापीठ बालविकास मंदिरात साजरा झालेला यंदाचा बालदिन मुलांसाठी केवळ आनंदाचा दिवस नव्हता, तर ज्ञान, संस्कार आणि सृजनशीलतेचा अविस्मरणीय प्रवास ठरला.

## अतिरिक्त सचिव पंचायती राज मंत्रालय भारत सरकार यांची विंग व शिरवळ ला भेट



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.१३, शिरवळ (सातारा) :** ग्रामपंचायत शिरवळ व विंग ता. खंडाळा येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान (RGSA) व पंचायत राज मंत्रालयाच्या विविध विकास कामांची व सांडपाणी प्रकल्प व घनकचरा प्रकल्पाची पाहणी करताना सुशील कुमार लोहानी (भा.प्र.से.) अतिरिक्त सचिव, पंचायती राज मंत्रालय भारत सरकार, मल्लिनाथ कलशेट्टी अतिरिक्त संचालक यशदा, सचिन घाडगे संचालक राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान पुणे, राहुल गावडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा, राहुल देसाई उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद सातारा, अनिल वाघमारे गटविकास अधिकारी पंचायत समिती खंडाळा सहा.गटविकास अधिकारी प्रकाश कुमार बोंबले, उपअभियंता संजय लाड, icds विभाग प्रमुख श्रीम. काळे, विस्तार अधिकारी सनील बोडरे तसेच विंग गावचे सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर सर्व सदस्य व शिरवळ गावचे सरपंच रवींद्र दुधगावकर, उपसरपंच सर्व सदस्य ग्रामपंचायत अधिकारी धायगुडे आण्णा व श्री.पडळकर अण्णा तसेच उमेद अभियानाचे प्रभाग समन्व्यक राजेश चव्हाण, गट समन्व्यक अतुल गायकवाड व सिमा गायकवाड आरोग्य उपकेंद्र विंग चे अधिकारी शासकीय अधिकारी बचत गटातील उमेद च्या सर्व महिला तसेच ग्रामपंचायत मधील सर्व कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

## आदिवासी भागात शासकीय योजना पोहोचवणार - सोनिया राजदेव

### वडगाव सावताळ येथे मोफत रेशन कार्ड वाटप शिबिर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर)** : ग्रामीण भागात शासकीय योजना पोहोचविण्यासाठी रेशन कार्ड हे महत्त्वाचे ओळखपत्र आहे. वडगाव सावताळ सारख्या आदिवासी भागात अनेक कुटुंबांना रेशन कार्ड नाही तसेच रेशन कार्डच्या ही समस्या आहेत. आधार कार्ड पॅन कार्ड स्मार्ट कार्ड हे सर्व आवश्यक असलेले डॉक्युमेंट सर्वसामान्य जनतेला सहज उपलब्ध व्हावेत. यासाठी विशेष कॅम्प वडगाव सावताळ सारख्या आदिवासी भागात आयोजित केला. या त्यांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना फायदा होणार आहे. यापुढील काळातही असे कॅम्प घेऊन सर्वसामान्यांची सेवा करणार असल्याचे टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाच्या नेत्या सोनियाताई रवींद्र राजदेव यांनी मत व्यक्त केले.

> "राजदेव दांपत्य पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील टाकळी ढोकेश्वर परिसरामध्ये निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध शासकीय योजना व आरोग्य शिबिर तसेच सेवा योजना या माध्यमातून ग्रामीण भागातील आदिवासी तसेच सर्वसामान्य जनतेची सेवा करत आहे. या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबांना नक्कीच फायदा होणार आहे."
>
> **– मोहनराव रोकडे (सामाजिक कार्यकर्ते)**

निलेश लंके प्रतिष्ठानाच्या वतीने आणि रविंद्र राजदेव यांच्या संकल्पनेतून तसेच सोनियाताई रविंद्र राजदेव यांच्या विशेष प्रयत्नांतून वडगाव सावताळ येथे मोफत रेशनिंग कार्ड शिबिर आणि श्रावणबाळ वृद्धापकाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते दीपक लंके, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी रविंद्र राजदेव, सोनियाताई राजदेव, सरपंच संजय रोकडे, दादाभाऊ रोकडे, हनुमंत विष्णू ठाणगे, सतीश तीखोळे, राजू रोकडे, सचिन जांभळकर, आदेश साळवे, बाबासाहेब भोबाळ, संदीप व्यवहारे, राजेंद्र भोसले, तुकाराम रोकडे, ज्ञानदेव रोकडे, दादाभाऊ गुंजाळ, सुभाष रोकडे, सुदाम पवार, सखुबाई साळवे, संतोष खरमाळे, संजय गोरडे, रामदास गांगुर्डे, गुलाब रोकडे, अशोक गोसावी, रोहित साळवे, बाबा जांभळकर, सुरेश पवार, चंद्रकांत झीटे, नांदूर पठारचे सरपंच भानुदास आग्रे, अनिल पवार, गौतम रोकडे, भाऊसाहेब चौधरी, बाळासाहेब झावरे, प्रणव पानसरे, कैलास राजदेव, जनार्दन चौधरी, संदेश आग्रे, निलेश रांधवण, अविनाश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## लासलगावमध्ये गुटखा साठ्यावर पोलिसांची कारवाई; ५२ हजार ५९० किमतीचा मुद्देमाल जप्त




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार राज्यात बंदी असलेल्या सुगंधित तंबाखू, जर्दा व गुटखा सदृश पदार्थांचासाठा करून ठेवणाऱ्या एका युवकावर लासलगाव पोलिसांनी कारवाई करत एकूण ५२ हजार ५९० किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गुन्हा रजि. क्रमांक २६१/२०२५ असा भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपशील, दि.१३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.४० वाजता, लासलगाव पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे, लासलगाव येथील शैलेश नंदकुमार बागमार (वय २१, रा. साईनगर, लासलगाव) यांच्या गाळ्यात छापा टाकला. या दरम्यान, प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर साठा आढळून आला.

**जप्त केलेला मुद्देमाल -**

पोलिसांनी पुढीलप्रमाणे एकूण ५२ हजार ५९० किमतीचा माल जप्त केला:

१) डायरेक्टर सुगंधित पान मसाला - २७ बॉक्स, छापील किंमत : रु.३६० प्रति बॉक्स, एकूण किंमत: रु.९ हजार ७२०

२) पांढऱ्या रंगाच्या ०५ प्लास्टिक गोण्या, प्रत्येक गोणीत ३० पॅकेट (एकूण १५०), प्रत्येक पुडीची किंमत रु.१२०, एकूण किंमत: १८ हजार

३) शीट ९९९ तंबाखू, १०२ पॅकेट, प्रति पॅकेट किंमत ₹१८०, एकूण किंमत: ₹१८,३६०

४) जी-१ जर्दा तंबाखू, १२२ पाकिटे, प्रति पाकीट ₹३०, एकूण किंमत: ₹३,६६०५) झेड.एन. ०१ जाफरानी जर्दा, ५७ पाकिटे, प्रति पाकीट रु.५०, एकूण किंमत: २ हजार ८५० गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचना क्रमांक ASUMAA/Notification/४९६/७, दि. १८/०७/२०२३ नुसार राज्यात अशा पदार्थांचे उत्पादन, साठवण, वितरण व विक्री यावर पूर्ण बंदी आहे. तरीही आरोपीने आर्थिक फायद्यासाठी प्रतिबंधित गुटखा व जर्दा पदार्थांचा साठा करून ठेवला होता.

पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक साळुंके, पो.कां. संदीप डगळे या प्रकरणातील पुरवठा साखळी, स्रोत व इतर संबंधितांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## निमगाव वाकडा कार्यक्षेत्रात कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीम सुरू

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** निमगाव वाकडा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात दि.१७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत व्यापक कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार आहे. लासलगाव, विंचूर, पिंपळगाव नजीक, पाचोरे तसेच परिसरातील सर्व गावांमध्ये घराघरात जाऊन कुष्ठरोगाची तपासणी करण्यात येणार आहे.

सन २०२७ पर्यंत राज्यातून कुष्ठरोग निर्मूलन हे उद्दिष्ट ठेवून प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमे दरम्यान कार्यक्षेत्रातील एकूण १२१६५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेट देणार असून १०० टक्के लोकसंख्येची प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

मोहिमेसाठी ४४ पथके व ९ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

**मोहीमेचा उद्देश -**

* समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधणे.
* रुग्णांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे.
* नवीन रुग्णांमुळे होणारी संसर्ग साखळी खंडित करणे.
* जागरूकता निर्माण करून कुष्ठरोगाविषयीचे गैरसमज दूर करणे.
* सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे.
* कुष्ठरोग मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे या जंतूमुळे होतो. यामुळे त्वचा, नसा, नाक व इतर अवयवांवर परिणाम होतो.

**कुष्ठरोगाची प्रमुख लक्षणे -**

* शरीरावर फिकट/लालसर बधीर चट्टे-डाग.
* तत्या ठिकाणी घाम न येणे.
* जाड, बधीर, तेलकट त्वचा.
* त्वचेवर लालसर गाठी.
* कानाच्या पाळ्या जाड होणे.
* त्वचेवर गरम-थंड संवेदना न जाणवणे.
* भुवयांचे केस विरळ होणे.
* डोळे पूर्णपणे बंद करता न येणे.
* हातातून वस्तू गळून पडणे.
* चालताना पायातून चप्पल निसटणे.
* हात-पायाची बोटे वाकडी होणे.
* हात/पाय लुळा पडणे.

मोहीमे दरम्यान पथके घराघरात जाऊन सर्वेक्षण करून संशयित रुग्णांची तपासणी करतील. नागरिकांनी भीती किंवा गैरसमज न बाळगता पथकांना सहकार्य करावे, असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्र, निमगाव वाकडा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. वरुणराज ठाकरे यांनी केले आहे.

## उपप्रादेशिक परिवहन अधिकार्यांकडून सुरक्षित वाहतुकीसाठी उपाययोजना लोकनेते कारखान्याचे ऊस वाहतूक चालकांना मार्गदर्शन



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१४, पंढरपूर :** नुकताच साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झालेला आहे. गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रेलर, ट्रॅक्टर गाडी, बैलगाडी, ट्रक इत्यादी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वर्दळीमुळे रस्ते अपघातात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना म्हणून सोलापूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत मोहोळ विभागातील अधिकाऱ्यांनी रस्तासुरक्षा पाऊले उचलली असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धरूढ कोलाटे यांनी दिली.

नुकतेच त्यांनी अनगर (ता.मोहोळ) येथील लोकनेते कारखान्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या चालकांना मार्गदर्शन केले. यावेळी मोहोळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व साखर कारखान्यांना रस्ता सुरक्षा सूचनांचे पालन करण्याबाबतचे सविस्तर सूचनापत्र कारखान्यावर अधिकाऱ्यामार्फत प्रत्यक्ष दिले. कारखान्याचा गळीत हंगाम सुरक्षितपणे पार पडण्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांनी रिफ्लेक्टर बसवावेत, वाहन नादुरुस्त झाल्यास ते तत्काळ मुख्य रस्त्याच्या बाजूला करावे, वाहनावर मोठे स्पीकर्स लावून कर्णकर्कश आवाजात गाणी ऐकत वाहन चालवू नये, मोबाईलवर बोलत तसेच दारू पिऊन वाहन चालवू नये , अनेक अंतरापर्यंत एका मागे एक सलग वाहन चालवु नये, वनात लायसन्स वाहन चालवु नये, इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख यावेळी अधिकार्यांनी केला. महत्त्वाच्या सूचनांची अंमलबजावणी कारखाना प्रशासनाने करून घ्यावी याबाबत सूचना पत्राद्वारे व प्रत्यक्ष भेटून दिल्या आहेत.

साखर कारखान्यांचा गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर वेळोवेळी प्रत्येक कारखान्यावर सुरक्षा शिबिर आयोजित करून सर्व चालकांना रस्तासुरक्षा मार्गदर्शन करण्यात ययेणार असल्याचे कोलाटे यांनी सांगितले. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धरूढ कोलाटे यांचेसह राहुल खंदारे, कोमल डांगे, लोकनेते शुगरचे मुख्य शेती अधिकारी एम.आय.देशमुख, उप शेती अधिकारी नेताजी बोडके, काटा क्लर्क अजित बोडके, झुंबरलाल शिंदे, दत्तात्रय कोळेकर, सरवदे तात्या, साठे आणि ऊस वाहतूक चालक उपस्थित होते.

# आ.मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर येथे ३६ कोटी ७० लक्ष रुपयांची न्यायालय इमारत मंजूर

## बल्लारपूर बार असोसिएशनने मानले आ.मुनगंटीवार यांचे आभार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, बल्लारपूर (चंद्रपूर) :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे बल्लारपूर तालुक्यातील नागरिकांचे अनेक वर्षांपासूनचे आधुनिक आणि प्रशस्त न्यायालयीन इमारतीचे स्वप्न अखेर पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.



आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ३६ कोटी ७० लक्ष रुपये किंमतीच्या मुख्य न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाला मंजुरी मिळाली असून, यामुळे तालुक्याच्या न्यायव्यवस्थेला नवी दिशा मिळणार आहे. आ. मुनगंटीवार यांच्या या महत्त्वपूर्ण पुढाकाराबद्दल बल्लारपूर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड सय्यद, उपाध्यक्ष ॲड किशोर पुसलवार, सचिव ॲड संजय बोराडे आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ३६ कोटी ७० लक्ष रुपये मुख्य न्यायालयीन इमारतीसह वकिलांसाठी अत्याधुनिक सभागृहासाठी १ कोटी ७२ लक्ष रुपये आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी ४ कोटी ७८ लक्ष रुपये मंजूर झाले आहेत. अनेक वर्षांपासून याठिकाणी सुविधांचा अभाव आहे. अशाच अवस्थेत सुरू असलेले कामकाज, जागेची कमतरता आणि नागरिकांची गैरसोय आता दूर होणार आहे. आधुनिक सुविधा, सुरक्षित परिसर आणि कार्यक्षम व्यवस्था यामुळे न्यायप्रक्रियेला मोठी गती मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने बैठका घेत राज्य सरकारकडे ठामपणे पाठपुरावा केला. अधिवक्ता बैठकीत दिलेल्या आश्वासनाची त्यांनी प्रत्यक्ष पूर्तता करत दिलेला शब्द निभावला. या संपूर्ण प्रक्रियेत त्यांनी दाखवलेला पुढाकार, प्रामाणिक बांधिलकी आणि प्रत्येक टप्प्यावर केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा याबद्दल बल्लारपूर तालुका बार असोसिएशनने त्यांचे आभार मानले आहे.

विधी क्षेत्र कायम आपले कृतज्ञ राहील, अशा भावनिक शब्दांत अध्यक्ष ॲड. सय्यद सर, उपाध्यक्ष ॲड. किशोर पुसलवार, सचिव ॲड. संजय बोराडे, सहसचिव ॲड. अरविंद तितरे, कोषाध्यक्ष ॲड. विकास गेडाम, सदस्य ॲड. प्रणय काकडे, ॲड. बी. एस. खनके, ॲड. अविनाश सिंह या सर्व पदाधिकाऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे. यासोबतच न्यायालय इमारतीच्या उभारणीचा निर्णय हा केवळ एका प्रकल्पाचा शुभारंभ नसून, न्याय आणि पारदर्शकतेच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या विकासाभिमुख नेतृत्वामुळे बल्लारपूर तालुक्याचा न्यायव्यवस्थेतील नवा अध्याय सुरू होत असल्याचा विश्वास बल्लारपूर तालुका बार असोसिएशनने व्यक्त केला आहे.

# गाडी नदीवर पनवेल - करंजाडे पूल बनणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, पनवेल :** नागरिकांची होणारी गैरसोय व वाहतुक कोंडी लक्षात घेऊन पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील भुखंड क्रमांक ५०६, पनवेल बाजूने करंजाडे मलनिस्सारण उदंचन केंद्राजवळ गाढी नदीवर नवीन पूल उभारण्याची योजना आखली आहे.



पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणी नूसार, नागरिकांची होणारी गैरसोय व वाहतुक कोंडी लक्षात घेऊन पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी गाढी नदीवर नवीन पूल उभारण्याची मागणी मान्य केली आहे. या पुलामुळे पनवेल शहर, करंजाडे व वडघर येथील सिडको वसाहतीतील वाढत्या वाहतुकीचा ताण कमी होणार आहे. करंजाडे जाणाऱ्या सध्याच्या पूलावरती वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असून बऱ्याच वेळेला वाहतूक कोंडी होत असते. तसेच येणाऱ्या काही दिवसात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल – करंजाडे मार्गावर होणारा हा पूल वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी एकूण अंदाजित खर्च रु. ४८ कोटी ४० लाख २२ हजार २९५.६३ रुपये इतका असून, पुलाच्या आराखड्याचा प्रस्ताव प्रशासकीय महासभेत मंजूर झाला आहे. येत्या काही दिवसातच या कामास प्रत्यक्षात कामास सुरुवात होणार आहे. या प्रस्तावानुसार ४ लेनचा, २४० मीटर लांबीचा आणि २१.५ मीटर रुंदीचा पूल उभारण्यात येणार आहे.

पुलाच्या पूर्वेकडे पनवेल महानगरपालिकेचा ४० फूट रस्ता असून पश्चिमेकडे सिडकोच्या करंजाडे नोडकडे २० मीटर रुंद रस्ता आहे.

या दोन्ही रस्त्यांना जोडल्याने परिसरातील वाहतूक सुलभ होईल व भविष्यातील वाढत्या रहदारीला दिशा मिळेल असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केले आहे. या पूल बांधकामासाठी सिडको, जलसंपदा विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून अनुक्रमे ना-हरकत प्रमाणपत्रे मागवण्यात येणार आहेत. तसेच, पुलाच्या संकल्पनात्मक आराखड्याची तपासणी आणि मंजुरी आयआयटी मुंबई किंवा व्हीजेआयटी मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणार असल्याचे शहर अभियंता संजय कटेकर यांनी सांगितले आहे.

# उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात प्रशासनाची धडक कारवाई; औषधांच्या पाकिटात आढळून आली दारू...?

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, उल्हासनगर (ठाणे) :** उल्हासनगरमध्ये नशा पदार्थांवर कठोर कारवाई करण्यात आली. सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या २४ तास गस्तीदरम्यान अनेकांना नशेचे पदार्थ लपवून आत येताना पकडण्यात आले आहे. या धडक मोहिमेमुळे रुग्णालय परिसरात शिस्त, स्वच्छता आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण झाले आहे.

उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालय प्रशासनाने अंमलात आणलेली ही कठोर शिस्त आता प्रत्यक्षात दिसू लागली आहे. रुग्णालयाच्या परिसरात गुटखा, तंबाखू, बीडी, सिगारेट आणि अगदी दारूचे सेवन करणाऱ्यांवर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

गेटवर आणि परिसरात नियमित गस्त घालताना अनेकांना नशेचे पदार्थ वापरताना रंगेहाथ पकडण्यात आले असून काहींनी औषधांच्या पाकिटात दारू लपवण्याचा प्रयत्न केल्याचेही समोर आले आहे. या सर्व प्रकारांमुळे प्रशासनाने आता आणखी कडक पावले उचलण्याची तयारी दर्शवली आहे.

रुग्णालय प्रशासनाच्या आदेशानुसार, परिसरात कोणत्याही प्रकारचे मादक पदार्थ बाळगणे, सेवन करणे किंवा आतमध्ये आणणे यावर संपूर्ण बंदी आहे. तरी देखील काही रुग्णांच्या नातेवाईकांकडून या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले.



काही जणांनी गुटखा किंवा तंबाखू तोंडात लपवून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी दारूच्या बाटल्या औषधांच्या पाकिटांत ठेवून आत नेण्याचा प्रयत्न केला. मात्र सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे हे प्रकार वेळीच थांबवण्यात आले. गेटवर आणि परिसरात २४ तास गस्त घालणाऱ्या सुरक्षा रक्षकांनी गेल्या काही दिवसांत अनेक अशा घटनांचा पर्दाफाश केला आहे. काहींना ताबडतोब इशारा देऊन सोडण्यात आले तर काहीं विरुद्ध प्रशासकीय अहवाल तयार करून दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव करण्यात आला आहे. या कारवाईमुळे रुग्णालय परिसरात शिस्त आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये या मोहिमेबाबत सकारात्मक प्रतिसाद दिसत आहे.

या कारवाईमुळे रुग्णालय परिसरात केवळ शिस्तच नव्हे, तर आरोग्यदायी आणि स्वच्छ वातावरण तयार झाले आहे. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्येही रुग्णालय म्हणजे आरोग्याचे मंदिर ही भावना दृढ होत आहे. रुग्णालय प्रशासनाने पुढेही ही मोहीम सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला असून, समाजात नशामुक्तीचा ठोस संदेश देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

दरम्यान रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.मनोहर बनसोडे यांनी सांगितले की, रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाने हे लक्षात ठेवावे की येथे येणारा प्रत्येक व्यक्ती उपचारासाठी किंवा सेवेसाठी येतो, नशा करण्यासाठी नाही. रुग्णालय परिसरात कोणत्याही प्रकारचा नशा किंवा त्याचे पदार्थ आढळल्यास थेट पोलिसांमार्फत कारवाई केली जाईल.

# सगरोळी येथील युवा शेतकऱ्यांची कर्जाला कंटाळून आत्महत्या



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** सततच्या नापिकीमुळे डोक्यावर कर्जाचे ओझे झाल्यामुळे सगरोळी येथील युवा अल्पभूधारक शेतकऱ्याने विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना सगरोळी येथे घडली असून यामुळे गावावर शोककळा पसरली आहे. मागील काही वर्षांपासून नैसर्गिक अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर पिकाचे संकट कोसळत असून यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून या नैसर्गिक संकटाच्या नापिकीमुळे डोक्यावर कर्जाचे ओझे झाल्यामुळे या नैराश्यातुन बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील अल्पभूधारक युवा शेतकरी माधव रामलु चुन्नमवार वय वर्षे ३९ हे कर्जबाजारी पणाला कंटाळून गेल्या दोन दिवसापूर्वी विषारी औषध पिल्यामुळे त्यास शेजारी तेलंगना राज्यातील निजामाबाद येथे शासकीय रुग्णालयांत उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

उपचार चालू असताना दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असून या घटनेमुळे सगरोळी गावावर शोककळा पसरली असून या अल्पभूधारक शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी. अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार; २५ वर्षांपर्यंत मोफत वीज मिळणार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने स्मार्ट योजना सुरु केली आहे. दारिद्र्य रेषेखालील १.५४ लाख तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ३.४५ लाख अशा महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या पाच लाख घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ६५५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर राबविण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरु केली आहे. त्यामध्ये ग्राहकांना एक किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी ३० हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. स्मार्ट योजनेत या अनुदानाखेरीज राज्य सरकारकडूनही अनुदान मिळणार असल्याने वीज ग्राहकाला खूप कमी हिस्सा भरुन प्रकल्प बसविता येईल, अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली. पीएम आवास योजनेसाठी ही लागू अनेक नागरिक शासनाच्या पीएम आवास योजनेचा लाभ घेऊन घरे बांधतात. अशा वीज ग्राहकांना देखील या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय महावितरणकडून घेण्यात आला आहे.

# थोडक्यात

## श्री महावीर विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१४, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील श्री महावीर विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारताचे पहिले पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरू व श्री महावीर जैन विद्यालय या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी स्व.बाबुलालजी ब्रम्हेचा यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भारताचे पहिले पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरू व शिक्षणमहर्षी स्व.बाबुलालजी ब्रम्हेचा यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रम्हेचा व पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी भारताचे पहिले पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनचरित्र विषयी माहिती विद्यालयाचे उपशिक्षिका प्रज्ञा काळे यांनी सांगितली. शिक्षण महर्षी स्व.बाबूलालजी ब्रम्हेचा यांच्या जीवन चरित्र विषयी माहिती विद्यालयाचे उपशिक्षक ज्ञानेश्वर मोहन यांनी सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक भगीरथ सोनवणे व आभार प्रदर्शन उपशिक्षक नितीन कापडणीस यांनी केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राचार्या पल्लवी चव्हाणके, पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ व सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. भारताचे पहिले पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरू व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी स्व.बाबूलालजी ब्रम्हेचा यांना जयंती निमित्त संस्थेचे कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रम्हेचा, मानद सचिव शांतीलाल जैन, खजिनदार अजय ब्रम्हेचा, संचालक मोहनलाल बरडिया, महावीर चोपडा, अमित जैन, सुनिल आब्बड व संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रम्हेचा यांनी विनम्र अभिवादन केले. व सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## कल्याण येथे रिक्षा प्रवास मीटर प्रमाणे ?

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, ठाणे :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कल्याण (पश्चिम) रेल्वे स्टेशन येथे मीटरप्रमाणे रिक्षा वाहतूक (पहिला टप्पा) दि.१८ नोव्हेंबर २०२५ पासून सुरु करण्यात येत आहे. याबाबत कल्याण (पश्चिम) या विभागातील ऑटोरिक्षा संघटना यांना कळविण्यात येते की, दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता वरील नमुद ठिकाणी आपल्या ऑटोरिक्षा संघटनाचे पदाधिकारी तसेच संघटनाचे सभासद यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे तसेच जास्तीत जास्त प्रवाशांना मीटरप्रमाणे रिक्षा प्रवास करण्याबाबत प्रोत्साहित करावे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण, आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

## सुपा परिसरातील बिबट्यांचा सहवास कायम !

**अक्षराज : राजकुमार इकडे**



**दि.१४, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा परिसरात बिबट्यांचा सहवास गेल्या एक वर्षापासुन चालुच आहे रात्रीच्या वेळी बाहेर जाने अगदी धोक्याचे झाले आहे, गेली काही दिवसात वनखात्याच्या अधिकारी वर्गानी बिबट्या जेलबंध करुन घेउन जात असतांना मधेच पिंजर्यातुन बिबट्या सुटला आणी पसार झाला. अनेक ठिकाणी पिंजरे लावून ही काहीच उपयोग होत नाही.

अनेक वेळा बिबटे जेलबंध करुन नियोजित ठिकाणी सोडुन ही सुपा पंचक्रोशीतील बिबट्यांचा सहवास दररोज ठिकठिकाणी पहावयास मिळतो. दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी सुपा परीसरातील रुईछत्रपती येथील परीसरात खंडोबा माळ मंदीरांजवळ बारवकर मळ्याजवळ मध्यरात्रीच्या वेळी बिबट्याचे दर्शन घडले. तरी सुपा पंचक्रोशीतील रांजणगाव, पिंपरीगवळी, बाबुर्डी येथील सर्व नागरीक, शेतकरी बांधवानी सतर्क राहण्यासाठी रुईछत्रपती येथील माजी सरपंच जनार्धन दिवटे व रांजणगाव येथील माजी सरपंच बंटीशेट साबळे यांनी प्रसारमाध्यमाद्वारे सर्वानी सतर्क राहण्यासाठी सांगितले आहे.

## माधवराव पाटील महाविद्यालयात पंडित नेहरू जयंती साजरी



**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.१४, पालम (परभणी) :** राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे माधवराव पाटील महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए.डी.आरसुळे, माजी प्राचार्य डॉ. एच.टी.सातपुते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.कालिदास गुडदे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार करून कार्यक्रमाचे सुरुवात झाली.

प्राचार्य डॉ.ए.डी.आरसुळे यांनी आपल्या मनोगतात पंडित जवाहरलाल नेहरू यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, पंतप्रधान म्हणून केलेले कार्य आणि विज्ञान युगाची सुरुवात इत्यादी बाबीवर विचार व्यक्त केले. डॉ.एच.टी.सातपुते यांनी भारत सर्वात मोठी लोकशाही असून याचे सर्व श्रेय पंडित जवाहरलाल नेहरू यांना जात असल्याचे म्हटले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.